मुंबई विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

Azadi Ka Amrit Mahotsav

वेबसाइट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/११८५
दिनांक : २७.०३.२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई उपनगर जिल्हयातील मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४.**
संदर्भ : सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर, यांचे पत्र क्र.सआसक/मुंउप/ लोकसभा निवडणूक/२०२३-२४/यांचे पत्र.

मा.महोदय/महोदया,

उपरोक्त प्राप्त संदर्भ पत्रानुसार मुंबई उपनगर जिल्हयामध्ये Booth Level Management साठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे नियोजन करणे आवश्यक आहे असे कळविण्यात आले आहे.

मुंबई उपनगर जिल्हयात ४ लोकसभा मतदारसंघ व त्यअंतर्गत २६ विधानगभा मतदारसंघ आहेत, त्याचप्रमाणे मुंबई उपनगर जिल्हयात अंतिम मतदार यादी प्रसिध्द २३ जानेवारी, २०२४ नुसार एकूण मतदार संख्या ७२१७३०८ एवढी आहे. तसेच मुंबई उपनगर जिल्हयात एका मतदार केंद्र ७३५३ आहेत. त्यामध्ये एकाच ठिकाणी पाच व त्यापेक्षा जास्त मतदान केंद्रं असलेली ठिकाणे मोठया प्रमाणावर आहेत त्यातील काही ठिकाणं पक्के तर काही ठिकाणं तात्पुरत्या मंडपात आहेत. या सर्व मतदान केंद्रावर मतदानासाठी येणाऱ्या सर्व मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे यासाठी, त्या ठिकाणी कलर कोड करून, गर्दीचे नियोजन करण्यासाठी Booth Level Management Plan तयार करण्यात आलेला आहे या Plan प्रमाणे काम करण्यासाठी 'राष्ट्रीय सेवा योजना' च्या विद्यार्थ्यांचे स्वयंसेवक म्हणून सहाय्य घेण्यात यावे असे कळविण्यात आले आहे.

तरी आगामी लोकसभा सर्वत्रिक निवडणूक - २०२४ करीता पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची स्वंससेवक म्हणून नियुक्ती करण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावरून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची निवड करून प्रशिक्षण आयोजनाबाबत या कार्यालयास कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षणाचा हॉल, ठिकाण, वेळ या बाबत माहिती सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर (संदर्भ पत्रानुसार) यांचे कार्यालयातील श्री. विलास पंडित (९५९४०२८८४०) यांना कळविण्यात यावे हि विनंती.

सदर प्रकरणी निवडणूकीची प्राथम्यता असल्याने तात्काळ कार्यवाही अपेक्षित आहे.

आपला,

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**सोबत :** उपरोक्त संदर्भ पत्र.

सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर.
नवीन प्रशासकीय ईमारत, ४ था मजला, आर.सी.चेंबुरकर मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७१.
दुरध्वनी क्र. ०२२-२५२२२०२३. ईमेल - mumbaisubpwd@gmail.com


सआसक/मुंउप/लोकसभा निवडणूक/२०२३-२४/ दिनांक: /०३ /२०२४

**निवडणूक तात्काळ**

प्रति,
श्री. सुशील शिंदे,
विभाग प्रमुख, राष्ट्रीय सेवायोजना
मुंबई विद्यापीठ, बी. रोड, चर्चगेट,

विषय - **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४.**
आगामी लोकसभा सर्वत्रिक निवडणक-२०२४ पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी NSS च्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून विद्यार्थांचे प्रशिक्षण आयोजित करणे.

संदर्भ - १. मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील आदेश क्र. निवडणूक/मुंउजि/जा.क्र. २०३/२०२४ दिनांक २१.०२.२०२४
२. मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील आदेश क्र. निवडणूक/मुंउजि/जा.क्र. ४५२/२०२४ दिनांक १४.०३.२०२४

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार मुंबई उपनगर जिल्हया करीता समन्वय अधिकारी म्हणून District Level PWD) Voters Management म्हणून माझी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मुंबई उपनगर जिल्हयात ४ लोकसभा मतदारसंघ व त्याअंतर्गत २६ विधानसभा मतदारसंघ आहेत, त्याचप्रमाणे मुंबई उपनगर जिल्ह्यात अंतिम मतदार यादी प्रसिध्द २३ जानेवारी २०२४ नुसार एकूण मतदार संख्या ७२१७३०८ एवढी आहे. तसच मुंबई उपनगर जिल्ह्यात एका मतदार केंद्र ७३५३ आहेत. त्यामध्ये एकाच ठिकाणी पाच व त्यापेक्षा जास्त मतदान केंद्र असलेली ठिकाणे मोठ्या प्रमाणावर आहेत त्यातील काही ठिकाणं पक्के तर काही ठिकाणं तात्पुरत्या मंडपात आहेत. या सर्व मतदान केंद्रावर मतदानासाठी येणाऱ्या सर्व मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे यासाठी, त्या ठिकाणी कलर कोड करून, गर्दीचे नियोजन करण्यासाठी Booth Level Management Plan तयार करण्यात आलेला आहे. या Plan प्रमाणे काम करणेसाठी "NSS" च्या विद्यार्थ्यांचे स्वयंसेवक म्हणून सहाय्य घेण्यात यावे असे संदर्भ क्र. २ अन्वये कळविण्यात आले आहे.

तरी आगामी लोकसभा सर्वत्रिक निवडणक-२०२४ करीता पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी NSS च्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून नियुक्ती करण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावरून NSS स्वयंसेवकांची निवड करून प्रशिक्षण आयोजनाबाबत या कार्यालयास कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षणाचा हॉल, ठिकाण, वेळ या बाबत माहिती कळवावी. सदर प्रकरणी निवडणुकीची प्राथम्यता असल्याने तात्काळ कार्यवाही करावी हि विनंती.

या प्रकरणी या कार्यालयाचे श्री. विलास पंडित (मोबाईल क्र. ९५९४०२८८४०) यांचेशी संपर्क साधण्याबाबत संबंधितांना निर्देश व्हावेत, हि विनंती.

आपला,

(प्रसाद खैरनार),
सहायक आयुक्त, समाज कल्याण,
तथा जिल्हा दिव्यांग समन्वयक अधिकारी,
मुंबई उपनगर.


Received
26/3/2024
O.S.D., N.S.S
University of Mumbai


प्रत- माहितीस्तव सविनय सादर
मा. उपजिल्हांधिकारी निवडणूक अधिकारी मुंबई उपनगर जिल्हा